# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २९/०८/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

### विनयभंग

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– दिनांक २८/०८/२२ चे रात्री ११.०० वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय २५ वर्ष हिचा नवरा सांयकाळी ०४.०० वा. कामावर गेला असता ती व तीची मुलगी घरी होते. त्यादरम्यान आरोपी नामे– किशोर कांबळी हा तेथे आला व पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ करपाते मो.क्र. ९९६०६८२४७८ हे करीत आहे.

### जबर दुखापत

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत मौजा परसोडी पोस्ट चांपा ता. उमरेड येथे दि. २५/०८/२०२२ चे ११.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– शंकर पांडुरंग पाटील, वय ५९ वर्ष, रा. परसोडी ता. उमरेड यांचे गावात आरोपी क्र. १. राजेश गोपीचंद सोमकुवर, वय ५२ वर्ष, रा. परसोडी ता. उमरेड हा आपले परीवारासह राहतो. आरोपी क्र. १ यास राणी सोमकुवर हिला शेतीचा हिस्सा मांग म्हणुन फिर्यादी भडकवतो असा आरोपीचा संशय असल्याने त्यांच्या नेहमी भांडण होत होते. दि २७/०८/२०२२ रोजी सायंकाळी ०४.०० वा. सुमारास फिर्यादी हे बसस्टाप वरून घरी येत असता त्यांना आरोपी क्र. १ याने 'तु माझे भाउ सूनेच्या घरी जाते आणी तिला शेतीचा हिस्साबाबत भडकवतो' असे म्हणुन फिर्यादीला काठीने मारहाण केली. तेव्हा फिर्यादी हा ओरडला असता बोधीसत्व शेन्डे व अश्वीन उके यांनी फिर्यादीला सोडवले आणी दोघांना समजवल्याने फिर्यादी हे घरी गेले. दि. २८/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. सुमारास गावातील चौकातील पुलावर फिर्यादी बसले असता अचानक राजेश सोमकुवर आणी २ विधीसंर्घष बालक आले आणी भाउ सुनेचा शेताचे हिस्साचे वादावरून त्यांनी फिर्यादीचे डोक्यावर व पाठीवर काठीने मारून मारले तेव्हा त्यांचे डोक्यातुन रक्त निघुन ते जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि प्रशांत खोब्रागडे मो.नं. ८८८८८१७१८३ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

१) पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील खिंडसी तलाव येथे दिनांक २८/०८/२०२२ चे १६.१० वा. सुमारास **जनक भदरू कावरे (मृतक), वय ४६ वर्ष, रा. ग्राम पतबिहारी ता. लालबरी जि. बालाघाट मध्यप्रदेश** हा खिंडसी तलावाच्या किनाऱ्यावर हातपाय धुत असतांना त्याचा पाय घसरून तो पाण्यात पडुन बुडुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— लक्ष्मण भदरू कावरे वय ५१ वर्ष रा. ग्राम पतबिहारी ता. लालबरी जि. बालाघाट मध्यप्रदेश यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस शिपाई गोरखनाथ निर्बाते मो.क्र. ९०९६८०५८९८ हे करीत आहेत.

२) पो.स्टे. उमरेड :— अंर्तगत मेडीकल कॉलेज नागपूर येथे फिर्यादी नामे— पंकज राजेश्वर चिमुरकर वय २१ वर्ष रा. ईतवारीपेठ कुंभारपुरा उमरेड यांचा लहान भाउ **प्रदीप राजेश चिमुरकर (मृतक), वय १७ वर्ष, रा. ईतवारीपेठ कुंभारपुरा उमरेड** याला लहानपणा पासुन सिकलसेल ची बिमारी होती. त्याचा उपचार मेडिकल कॉलेज नागपुर येथे सुरू होता. दि. २६/०८/२०२२ रोजी १६.०० वा. सुमारास त्याची प्रकृती जास्त खराब झाल्याने त्याला उपचाराकामी प्रथम सरकारी दवाखाना उमरेड व नंतर मेडिकल कॉलेज नागपुर येथे दि २६/०८/२०२२ रोजी भरती केले असता दि. २६/०८/२०२२ चे १९.५५ वा. डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. मृतकच्या भावाचे मेडिकल कॉलेज नागपुर येथुन प्राप्त झालेल्या बयानावरून व कागदपत्रावरून सदरचा मर्ग दाखल करून चौकशीत घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री खोब्रागडे मो.क्र. ९८९०२२२८४९ हे करीत आहेत.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. कोंढाळी :— अंतर्गत मौजा गरमसुर येथे दिनांक २७/०८/२०२२ चे २०.०० वा. पुर्वी **मनोज गोमाजी इरपाची वय ३१ वर्ष (मृतक), रा. गरमसुर ता. काटोल जि. नागपुर** याचे अंदाजे ०२ वर्षापुर्वी झालेल्या अपघातामध्ये डोक्याला मार लागल्याने त्याचे मानसिक संतुलन बरोबर नसल्याने व तो दारू पिण्याचा सवईचा असल्याने त्याने आपल्या राहते घरी दारूचे नशेत गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— वासुदेव गोमाजी इरपाची, वय ३४ वर्ष, रा. गरमसुर ता. काटोल जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार सुनील बन्सोड मो.क्र. ९७६४०९०२०८ हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर